**११) नेर प्रकल्प :-**

नेर लघु प्रकल्प यवतमाळ जिल्हयातील नेर तालुक्यातील पाथ्रड गोळे या गावाजवळुन वाहणार्‍या मिलमीली या स्थानीक नाल्यावर बांधण्यात आलेला आहे. या प्रकल्पाचे धरणाचे काम पुर्ण झालेले असून कालव्याचे काम देखील बहुतांश पूर्ण झालेले आहे.

सद्य:स्थिती सिंचन क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने तसेच लाभक्षेत्र सहकारी पाणी वापर संस्थांना हस्तांतरीत करण्याचे दृष्टीने अनुषंगीक कामे प्रगतीपथावर आहेत. नेर लघु प्रकल्पाचे यवतमाळ व अमरावती जिल्हयातील मिळून एकुण सिंचन क्षेत्र ८७८ हे. व सिंचन क्षमता ७२९ हे. इतकी असुन प्रकल्पीय सिंचन क्षमता पूर्णतः स्थापीत झालेली आहे.

केंद्र शासनास अर्थसहाय्यीत दुरुस्ती नुतनीकरण व पुन:र्स्थापन (RRR) योजने अंतर्गत प्रकल्पांच्या दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

## प्रकल्पांचे नाव :- नेर प्रकल्प

तालुका : नेर जिल्हा : यवतमाळ

### (अ) ठळक वैशिष्टे

| जलग्रहण क्षेत्र | पिण्याचे पाणी आरक्षण | प्रकल्पीय पाणीसाठा | निर्मीत पाणीसाठा | प्रकल्पीय सिंचन क्षमता | निर्मीत सिंचन क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| ८०.०० चौ.कि.मी. | १.५८६ दलघमी | ६.७९ दलघमी | ६.७९ दलघमी | ७२९ हे. | ७२९ हे. |

### (ब) प्रशासकीय / आर्थिक बाबी

- प्रशासकीय मान्यता :- रू.२.८४ कोटी दि. ११/०४/१९९१
- सुधारित प्रशासकीय मान्यता रू.१७.३६ कोटी दि. २२/०६/२००९
- अद्यावत किंमत- रु.१७.३६ कोटी
- सन २०१५-१६ चे उपलब्ध अनुदान- रु. (-) ०.५८ कोटी (मागील शिल्लक + उपलब्ध अनुदान)
- ( (-) ०.५८ + ०.०० )
- मार्च २०१५ अखेर झालेला खर्च- रु.१७.०५ कोटी
- कामाची सद्य:स्थिती - धरण - १०० टक्के
  सांडवा - १०० टक्के
  कालवे - १०० टक्के
  वितरण प्रणाली - १०० टक्के

- आवश्यक भुसंपादन :-

| | आवश्यक जमिन | संपादित जमिन |
|---|---|---|
| १) खाजगी जमिन | ५१६.०० हे. | ५१६.०० हे. |
| २) सरकारी जमिन | ०.०० हे. | ०.०० हे. |
| ३) वनजमिन | ०.०० हे. | ०.०० हे. |

- पुर्नवसन- आवश्यकता नाही.
- प्रकल्प पुर्ण करण्याचे नियोजन-

| वर्ष | निधी | साठा निर्मिती | सि.क्ष.नि |
|---|---|---|---|
| २०१५-१६ | ०.३१ कोटी | -- | -- |

- **नियोजनानुसार काम पुर्ण करण्यास अडचणी** - निधीची अडचण